27/7/87

शेतकरी शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती [महाराष्ट्र]

- ५९ , बुधवार पेठ, पुणे - ४११००२ -

दिनांक :- २७/७/१९८७

प्रति,

सप्रेम नमस्कार,

शेतमजूरांच्या किमान वेतनाचे संदर्भात समन्वय समितीच्या वतीने आपण सातत्याने प्रयत्न करीत आहोत. किमान वेतनात त्वरीत दुप्पट वाढ करून शासकिय निकषावर आधारीत किमान वेतन ठरवावे. व रहाणीमान - निर्देशांकाशी त्याची सांगड घालावी. अशी मागणी आपण सातत्याने करत आहोत.

परंतू शासनाने शेतमजूरांचे किमान वेतन निर्धारीत करण्यासाठी नुकतीच जी कमिटी नेमली आहे. तिचे स्वरूप पाहाता. शेतमजूरांना न्याय मिळेल असे वाटत नाही. तसेच राहणीमान निर्देशांकाशी किमान वेतन जोडण्याचा प्रश्न हो कमिटी समोर दिला नाही, उलट शेतमजूरांचे किमान वेतन व रोजगार हमी कामगारांचे वेतन यातील परस्पर संबंध रद्द करावेत. किंवा काय ? असा एक मुद्दाही या कमिटीकडे सोपविला आहे. शेतमजूर व रोजगार हमी कामगार यांचे दृष्टिने हे सर्व महत्वाचे आहेत. म्हणून या प्रश्नांचा विचार करून आपली भूमिका ठरविण्यासाठी एक बैठक दिनांक :- १८ ऑगस्ट ८७ रोजी दुपारी १ वाजता आयोजित केली आहे.

स्थळ :- ट्रेड युनियन सेंटर
१०१ , शिवाजी नगर, नव्या पुला खाली
मंगला टॉकीज शेजारी, पुणे - ४११०० ५
फोन नं . ५७६६०

तरी आपण आपल्या प्रमुख सहका-यासह बैठकीस हजर रहावे ही विनंती . कळावे,

आपले ,

SSPatil      [signature]

कॉ. संतराम पाटील      बा. न. राजहंस

निमंत्रक

शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती.

प्रती,

मा. ...................... ...